ज्योतिषविषयक
सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी
तपस्वी हॉटेल बेसमेंट, ९ इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION
MBBS | MD | MS | BDS | MDS
BAMS | BUMS | BHMS
PANCHAKARMA
DERMATOLOGY | NURSING
PHARMACY
PHYSIOTHERAPY
PARAMEDICAL | VETERINARY
OPHTHALMOLOGY | FMGE
Indo Abroad Education
9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १४१ वा | शुक्रवार, दि. ०२ जानेवारी २०२६ | पाने ४ | पोष्ट परवाना:- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# भाजपमधील असंतोषाचा उद्रेक

## निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या वेदनांवर सुषमा अंधारेंचे सडेतोड पत्र

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** तब्बल आठ वर्षांनंतर होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनी भाजपमध्ये उत्साहाऐवजी तीव्र अस्वस्थता आणि रोष निर्माण केला असून, उमेदवारी वाटपावरून पक्षात उघडपणे गोंधळ, संताप आणि बंडखोरीचे चित्र दिसू लागले आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून आयात उमेदवारांना तिकीटे देण्यात आल्याने भाजपच्या तळागाळातील कार्यकर्त्यांचा संयम सुटल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले. या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी भाजप कार्यकर्त्यांच्या ह्रकाळजाला हात घालणारेह्व सडेतोड पत्र लिहून थेट भाजप नेतृत्वावर गंभीर आरोप केले आहेत.

राज्यातील विविध शहरांमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करताना भाजपमधील अंतर्गत संघर्ष उघड झाला.

कुठे कार्यकर्त्यांनी नेत्यांना शिवीगाळ केली, कुठे मारहाणीचे प्रकार घडले, तर काही ठिकाणी आमदारांच्या गाड्यांचा पाठलाग, पक्ष कार्यालयासमोर उपोषणे, आत्मदहनाचे प्रयत्नही झाले. संभाजीनगरमध्ये एका महिला कार्यकर्तीने आत्मदहनाचा प्रयत्न




केल्याची घटना समोर आली, तर नाशिकमध्ये एबी फॉर्म घेऊन पळणाऱ्या आमदाराच्या मागे कार्यकर्ते धावताना दिसले. पुणे, मुंबई, ठाणे यांसारख्या महानगरांतही इच्छुक उमेदवारांचा संताप उफाळून आला.

या पार्श्वभूमीवर सुषमा अंधारे यांनी लिहिलेल्या पत्रात भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची व्यथा मांडली आहे. 'तुमची अस्वस्थता, आक्रोश आणि हतबलता माध्यमांतून सर्वांपर्यंत पोहोचते आहे, पण ती तुमच्या नेत्यांपर्यंत पोहोचत नाही,' अशा शब्दांत त्यांनी भाजप नेतृत्वावर टीका केली आहे.

अंधारे यांनी आरोप केला की, सत्तेच्या लालसेपोटी भाजपने ईडी, सीबीआय आणि अन्य यंत्रणांचा वापर करून विरोधी पक्षांतील भ्रष्ट, गुन्हेगार आणि स्वार्थी नेत्यांना पक्षात प्रवेश दिला. या नव्याने आलेल्या लोकांना जागा देण्यासाठी वर्षानुवर्षे पक्ष वाढवणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना बाजूला सारण्यात आले.

'ज्यांनी घर बांधलं, त्यांनाच घरातून हाकलून देण्याचा क्रूर मार्ग भाजपने अवलंबला,' असा थेट आरोप त्यांनी केला.

पत्रात अंधारे यांनी रूपकात्मक भाषेत भाजपची स्थिती मांडताना म्हटले आहे की, 'वारूळ मुंग्या बांधतात, पण त्यात राहायला विषारी नाग येतात.' भाजपचे सत्तेचे वारूळ निष्ठावंतांनी उभारले, मात्र आज त्या वारुळात बाहेरून आलेले सत्तांध लोक राहात असल्याची टीका त्यांनी केली. म्हणजेच 'वारूळ मुंग्यांचं, पण राहतात नाग' असंच त्यांना म्हणायचे असेल.

'मोदी का परिवार' अशी भावना जोपासणाऱ्या कार्यकर्त्यांना उद्देशून अंधारे म्हणतात की, तुम्ही परिवाराचा सदस्य नसून सत्तेपर्यंत जाण्यासाठीची एक पायरी आहात. नव्यांना घरात बसवण्यासाठी जुन्यांना रस्त्यावर आणले जात आहे, असा आरोप त्यांनी केला. 'तुम्ही परिवाराचा भाग नाही, फक्त पायरी आहात'.

दिल्लीपासून गल्लीपर्यंत सत्ता असूनही भाजप आपल्या कार्यकर्त्यांना समाधानी का ठेवू शकत नाही, असा सवाल उपस्थित करत अंधारे यांनी म्हटले की, सत्ता मिळवण्याइतकेच ती पचवणेही अवघड असते आणि भाजपला हे यश पचवता येत नाही.

सुषमा अंधारेंच्या या पत्रामुळे भाजपमधील अंतर्गत असंतोष पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर हा असंतोष भाजपसाठी किती अडचणीचा ठरेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मुख्य निवडणूक निरीक्षक यांची नॉर्थकोट प्रशाला येथे पाहणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५झ्र२६ च्या अनुषंगाने आज मा. मुख्य निवडणूक निरीक्षक श्रीमती नयना गुंडे (आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे)तसेच मा. निवडणूक निरीक्षक मलिकार्जून माने (अपर जिल्हाधिकारी, सातारा) यांनी सोलापूर शहरातील नॉर्थकोट प्रशाला येथे स्थापन करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १ ते ७ यांच्या कार्यालयांना तसेच आचारसंहिता कक्षास भेट देऊन सविस्तर पाहणी केली.या पाहणीदरम्यान निवडणूक प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत माहिती घेण्यात आली.



नामनिर्देशन अर्ज स्वीकारणे, अर्जांची छाननी, निवडणूक साहित्य व्यवस्थापन, आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी, तक्रार निवारण यंत्रणा, कार्यालयीन नोंदी व दैनंदिन अहवाल प्रणाली यांची तपासणी करण्यात आली. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या.या वेळी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त विना पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सह.आयुक्त गिरीष पंडित, नगर अभियंता सौ. सारिका अक्कूलवार तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी त्यांनी मतदान केंद्र ची पहाणी सुद्धा केली आणि आवश्यक त्या सूचना दिल्या मा. निरीक्षकांनी निवडणूक यंत्रणेची तयारी, उपलब्ध सुविधा व समन्वयाबाबत समाधान व्यक्त केले.

आगामी निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय वातावरणात व पूर्णपणे निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज करावे, असे निर्देश देण्यात आले.सोलापूर महानगरपालिका प्रशासन निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीत व यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# धर्मांध महायुतीला मातीत गाडण्यासाठी महाविकास आघाडी सज्ज - कॉ. आडम मास्तर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाविकास आघाडीने कंबर कसली आहे. धर्मांध भाजप व त्यांच्या भांडवली घटक पक्षांच्या महायुतीला मातीत गाडण्यासाठी महाविकास आघाडी जंग जंग पछाडणार आहे, असे ठाम मत ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी व्यक्त केले.

सत्तापिपासू भाजपकडून निवडणुकीत प्रलोभने, खोटी आमिषे व खोटी आश्वासने देऊन मते मागितली जातील. तसेच सत्तेच्या दबावाखाली



निवडणूक आयोग, प्रशासन व पोलीस प्रशासनाचा गैरवापर केला जात आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून तो मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पडणे आवश्यक आहे. जर प्रशासन व पोलीस यंत्रणा सत्तेच्या दबावाखाली वागत असतील, तर त्याला खंबीरपणे टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते सज्ज आहेत, असा इशाराही त्यांनी दिला.

गुरुवार, दिनांक 1 जानेवारी रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या दत्तनगर येथील मध्यवर्ती कार्यालयात पक्षाचे जिल्हा सचिव मेजर कॉ. युसुफ शेख यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा निर्धार मेळावा उत्साहात पार पडला.

या मेळाव्यात महाविकास आघाडीचे उमेदवार दत्तू अण्णा बंदपट्टे, गीता वासम, अरुणा आडम, ॲड. सुरेश गायकवाड, श्रीनिवास म्हेत्रे, सुषमा सरवदे, अनिता आडम, वल्लभ चौगुले यांचा परिचय करून देण्यात आला. यावेळी सर्व उमेदवारांनी आपले मनोगत व्यक्त करत परिवर्तनाचा निर्धार व्यक्त केला.

या मेळाव्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड अनिल वासम यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व व्यासपीठावर कॉ. दत्ता चव्हाण, कॉ. व्यंकटेश कोंगारी, कामिनीताई आडम, मुरलीधर सुंचू, अशोक बल्ला, रंगप्पा मरेड्डी, कुरमय्या म्हेत्रे, विक्रम कलबुर्गी, वीरेंद्र पद्मा, बालकृष्ण मल्याळ, बाबू कोकणे, लिंगवा सोलापूरे, अकील शेख, मल्लेशाम कारमपुरी आदी मान्यवर उपस्थित होते.

# आजपासून EVM यंत्रांची तपासणी होणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह राहावी, यासाठी मतदान यंत्रांची (EVM) FLC – First Level Checking (प्रथमस्तरीय तपासणी) प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया सोलापूर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या सर्व मतदान यंत्रांवर करण्यात येणार आहे.

ही FLC प्रक्रिया दि. 02 जानेवारी 2026 ते 04 जानेवारी 2026 या कालावधीत हुतात्मा स्मृती मंदिराच्या पाठीमागील



सभागृहात, दररोज सकाळी 11.00 वाजता पार पडणार आहे. या तपासणीदरम्यान मतदान यंत्रांची तांत्रिक स्थिती, कार्यक्षमता तसेच सुरक्षिततेची सखोल व काटेकोर पाहणी केली जाणार आहे.

निवडणूक प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत सहभागी असलेल्या सर्व राजकीय पक्षांनी आपल्या पक्षाचा एक अधिकृत प्रतिनिधी FLC प्रक्रियेसाठी उपस्थित ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित प्रतिनिधीने आपल्या पक्षाचे अधिकृत प्राधिकरण पत्र (Authorization Letter) तसेच कोणत्याही शासकीय कार्यालयाने निर्गमित केलेले वैध ओळखपत्र सोबत ठेवणे बंधनकारक राहणार आहे.

राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत FLC प्रक्रिया पार पडल्यास मतदान यंत्रांबाबत असलेला संभ्रम दूर होऊन निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा व राजकीय पक्षांचा विश्वास अधिक दृढ होईल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी या प्रक्रियेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

**FLC प्रक्रियेचा तपशील :**


- दिनांक : 02 जानेवारी 2026 ते 04 जानेवारी 2026
- स्थळ : हुतात्मा स्मृती मंदिराच्या पाठीमागील सभागृह, सोलापूर
- वेळ : सकाळी 11.00 वाजता

सोलापूर महापालिका निवडणूक शांततेत, पारदर्शक व विश्वासार्ह पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्व पातळ्यांवर तयारी सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून ही FLC प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

# वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास 'सरकारी नोकरी' आणि २५ लाखांची मदत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी, शेतमजूर किंवा जनावरे राखणाऱ्या गुराखी यांच्यावर वाघ व बिबट्या या वन्यप्राण्यांनी हल्ला केला व या हल्ल्यात त्यांचा जर मृत्यू झाला तर अशा हल्ल्यांना आता आपत्ती समजले जाईल.

वन्यजीवांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले शेतकरी, शेतमजूर किंवा जनावरे राखणाऱ्या गुराखी यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीसह 25 लाख रूपयांची भरपाई दिली जाणार असल्याचा



महत्त्वपूर्ण निर्णय राज्याच्या वन विभागाने घेतला आहे.

वन्य प्राण्यांच्या हल्ले झालेल्या संबंधित ठिकाणी ट्रॅप व कॅमेरेही बसवण्यात येणार आहेत. गावांतील नागरिक कायम सतर्क राहावेत, यासाठी सायरनची सोय केली जाईल. शिवाय, संवेदनशील भागांचे मॅपिंग केले जाणार असून रेस्क्यूपथक कायम तैनात असणार आहे. सर्व प्रकारच्या वन्यजीवांच्या हल्ल्यांना राज्य आपत्ती ठरवले आहे.

माणूस आणि वन्य प्राणी यामधील संघर्ष रोखण्याकरिता शासनाने पूर्व तयारीची जबाबदारीसुध्दा निश्चित केली आहे. हल्ल्यात शारीरिक दिव्यांगत्व प्राप्त झाल्यास त्याच्या तीव्रतेनुसार मदत दिली जाणार आहे. शिवाय, या प्राण्यांच्या हल्ल्यात झालेल्या जखमेनुसार वैद्यकीय उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाच्या रकमेला आता जलद मंजुरी मिळणार आहे.

**जिल्ह्यात बिबट्या व वाघाचे दर्शन**

वर्षभरात जिल्ह्यात मोहोळ, मोडनिंब, अकलूज, बार्शी, वैराग या गावाच्या परिसरात बिबट्या व वाघाचे दर्शन झाले होते. बार्शी तालुक्यातील हा बिबट्या खूप दिवसानंतर धाराशिवमध्ये गेला.

# नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच आंदोलन पेटले

## खासदारांचा येडेश्वरी शुगर कारखाना पाडला बंद

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी संघटनेच्या नवीन वषार्ची सुरुवात आंदोलनाने झाली असून ज्या ज्या साखर कारखान्यांनी उसाची पहिली उचल 3000 च्या पुढे जाहीर केलेली नाही अशा साखर कारखान्यावर शेतकरी संघटनेची राज्यभर आंदोलने सुरू असून आज बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या बाशीर्तील येडेश्वरी साखर कारखान्यावर शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी गव्हाणीत उड्या टाकून कारखाना बंद पाडण्यात आला.



यावेळी समाधान शिंदे, रणजीत शिंदे, अशोक कारकर, ज्ञानेश्वर शिंदे, संतोष किरडे, विजय शिंदे, आकाश नवले, हनुमंत शिंदे, नागेश शिंदे, श्रीधर शिंदे, प्रफुल्ल खैरे, नितीन शिंदे, विजय डमरे, संतोष शिंदे, दत्तात्रय शिंदे, नारायण तनपुरे, बाबा सांगडे, अनिल शिंदे, विष्णु शिंदे, गणेश नवले, अश्रूबा मोरे, शहाजी अडसूळ, सत्यवान शिंदे, श्रीहरी शिंदे, सिताराम लोंढे आदींसह पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

शेवटी रात्री उशिरा उर्वरित रक्कम देणे संदर्भात दिनांक ९ जानेवारी ते १२ जानेवारीच्या दरम्यान सोनवणे यांचे सोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिल्यानंतरच हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

यावेळी शंकर गायकवाड म्हणाले की, ठरल्याप्रमाणे 12 जानेवारीच्या आत उर्वरित दोनशे रुपये व अंतिम दर 3500 चे आश्वासन न दिल्यास, 12 जानेवारी नंतर कुठलेही निवेदन न देता पुन्हा कारखाना बंद करणार असल्याचा इशारा यावेळी गायकवाड यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिला.

पांगरी पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# एसटी बसस्थानकं आता चकाचक होणार!

## दर १५ दिवसांनी स्वच्छता मोहीम अनिवार्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवरील अस्वच्छतेचा प्रश्न आता गंभीर झाला असून, खुद्द परिवहन विभागानेच आता कंबर कसली आहे. सोलापूर बसस्थानकातील भीषण अस्वच्छता पाहून संतापलेल्या परिवहन मंत्र्यांनी आगार प्रमुखाचे थेट निलंबन केले होते. या कारवाईनंतर आता राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर दर १५ दिवसांनी ' स्वच्छता मोहीम राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

**सोलापूर आगार प्रमुखांवर झाली होती निलंबनाची कारवाई**

काही दिवसांपूर्वी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोलापूर बसस्थानकाची पाहणी केली होती. त्यावेळी स्थानकातील अस्वच्छता पाहून त्यांनी संताप व्यक्त केला होता आणि तात्काळ सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. बस आगार हे अस्वच्छतेचे आगार बनले आहे, असे खडेबोल त्यांनी सुनावले होते. मात्र, आठवडा उलटल्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल



न झाल्याचे पाहून सरनाईक यांनी थेट कारवाई केली. त्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत आगार प्रमुखाला जागेवरच निलंबित करण्याचे आदेश दिले.

**दर १५ दिवसांनी 'स्वच्छता मोहीम' सक्तीची**

त्यानंतर प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी महामंडळाने आता नवीन नियमावली जाहीर केली आहे. यानुसार बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच आणि विशेषतः महिला विश्रांतीगृहे व शौचालयांची १५ दिवसातून एकदा पूर्णपणे स्वच्छता करावी लागेल. यासंदर्भात निवेदन जारी करण्यात आलं आहे.

"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती. काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. साचलेला कचरा, अनावश्यक झाडे-झुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी-जमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे," असं या निवेदनात म्हटलं आहे.

"कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण व विल्हेवाट लावली जाणार असून प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रत्येक बसस्थानकावर या मोहिमेची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. दर १५ दिवसांनी होणाऱ्या या स्वच्छता मोहिमेमुळे एसटी बसस्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार असून प्रवासी सेवेमध्ये गुणवत्तावाढ होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे," असंही निवेदनातून सांगण्यात आलं आहे.

**प्रवाशांना मिळणार दिलासा**

नव्या स्वच्छता मोहिमेमुळे प्रवाशांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. आता ही मोहीम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात बसस्थानकांचे रूप पालटणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

# लोकसंख्या वाढतेय, शाळा बंद पडतायत!

**२०१४** साली देशाची लोकसंख्या सुमारे १२९ कोटी होती. त्या वेळी देशभरात ११,०७,१०१ सरकारी शाळा कार्यरत होत्या. दहा वर्षांनंतर, म्हणजे २०२४ मध्ये देशाची लोकसंख्या सुमारे १५ कोटींनी वाढून १४४ कोटींवर पोहोचली. मात्र, याच काळात सरकारी शाळांची संख्या घटून १०,१७,६६० इतकी झाली. म्हणजेच, लोकसंख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढूनही सुमारे ९० हजार सरकारी शाळा बंद झाल्या. हा आकडा केवळ सांख्यिकीय बदल नाही, तर सरकारच्या शिक्षणविषयक प्राथमिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा गंभीर वास्तव आहे. लोकसंख्या वाढ म्हणजे साहजिकच शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या वाढणे. त्यातच शिक्षणाचा अधिकार कायदा, डिजिटल युगातील स्पर्धा, कौशल्याधारित शिक्षणाची गरज या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या, तर सरकारी शाळांची संख्या वाढायला हवी होती. मात्र प्रत्यक्षात उलटे चित्र दिसते. याचा अर्थ काय घ्यायचा? सरकार शिक्षण क्षेत्राकडे खर्च म्हणून पाहतेय की गुंतवणूक म्हणून? शिक्षणाची गरज वाढतेय, सुविधा मात्र कमी का? सर्वसाधारणपणे सरकारी शाळा गावांच्या, शहरांच्या मध्यवर्ती भागात असतात. अशा जागांची किंमत आजच्या घडीला कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचलेली आहे. मग प्रश्न उपस्थित होतो, या बंद झालेल्या शाळांच्या जागा नक्की कोणाला मिळाल्या? सरकारी शाळा कुठे असतात? अनेक ठिकाणी असे दिसून आले आहे की, शाळा 'इमारत जीर्ण झाली' या कारणाखाली बंद करण्यात आली, ती इमारत पाडण्यात आली, आणि काही काळानंतर त्या जागेवरील शिक्षणासाठी असलेले आरक्षण रद्द करण्यात आले. त्यानंतर ती जागा इतर कारणांसाठी वापरण्यात आली. हा केवळ योगायोग आहे की ठरवून केलेली प्रक्रिया? ही संपूर्ण साखळी पाहिली तर असे वाटते की, शिक्षण हे प्राथमिक राहिलेले नाही, तर मौल्यवान जागांचा वापर करून निवडक लोकांना लाभ करून देणे हीच खरी प्राथमिकता बनली आहे. गरिबांचा, ग्रामीण भागातील, मध्यमवर्गीयांचा मुलगा सरकारी शाळेवर अवलंबून असतो. खासगी शिक्षण परवडत नाही म्हणून तो सरकारी शाळेत जातो. पण शाळाच बंद झाली, तर त्याने काय करायचे? आज शाळा बंद केल्या जात आहेत, उद्या शिक्षकांची पदे कमी केली जातील, परवा शिक्षणाचा दर्जा घसरल्याचे कारण देऊन आणखी शाळा बंद होतील ही साखळी थांबवली नाही, तर सरकारी शिक्षण व्यवस्था हळूहळू संपुष्टात येईल. याचा फटका कोणाला बसेल? सरकारला नाही, धोरणकर्त्यांना नाही, सामान्य जनतेला आणि भविष्यातील पिढ्यांना. शिक्षण ही केवळ घोषणा, जाहिरात किंवा आकड्यांची मांडणी नाही; ती देशाच्या भविष्यातील गुंतवणूक आहे. लोकसंख्या वाढत असताना शाळा बंद होणे हे धोरणात्मक अपयश आहे की जाणीवपूर्वक केलेली दुर्लक्षाची भूमिका याचे उत्तर सरकारने द्यायलाच हवे. आज प्रश्न असा नाही की किती शाळा बंद झाल्या, खरा प्रश्न असा आहे की, देशाचे भवितव्य घडवणाऱ्या शिक्षणालाच दुय्यम स्थान का दिले जात आहे?

# राज्यात मनपा निवडणुकीत सर्वच पक्षांकडून घराणेशाहीला उत!

राज्यात होऊन घातलेल्या मनपा निवडणुकीमध्ये घराणेशाहीला मोठ्या प्रमाणात ऊत आला आहे.यामुळे पैशाचाही वापर मोठ्या प्रमाणात होण्याची दाट शक्यता आहे.सोबतच अनेक गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना किंवा त्यांच्या हीतचिंतकांनाही अनेक पक्षांनी उमेदवारी दिल्याचे सांगितले जाते.यामुळे सर्वसामान्यांची गोची होवून पिछेहाट झाल्याचे दिसून येते.यावरून स्पष्ट होते की, एकीकडे प्रत्येक पक्ष घराणेशाहीचा मोठा विरोध करतो आणि दुसरीकडे प्रत्येक पक्षातील राजकीय पुढारी आपल्याच घरामध्ये राजकारण असावेत या उद्देशाने खेळी खेळतात व कार्यकर्त्यांच्या डोळ्यात अश्रू आणतात व मन दुःखावतात.यामुळे सर्वसामान्यांची गोची होते व प्रत्येक पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या तोंडुन एकच सुर निघतो की, आम्ही फक्त सतरंज्याच उचलायच्या का ?ही सत्य परिस्थिती राज्यात दिसून येते आणि सध्याच्या मनपा निवडणुकीमध्ये घराणेशाहीचे चित्र संपुर्ण महाराष्ट्रात उघडपणे स्पष्ट झाले आहे व धनशक्तीचा सुध्दा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, राजकीय पुढाऱ्यांच्या नातेवाईकांनाच लोकप्रतिनिधीत्व किंवा नगरसेवक करावे काय? इतरांनी फक्त हमालीच करावी व सतरंज्याच उचलायच्या का असे अनेक प्रश्न सर्वच पक्षाचे कार्यकर्ते आपापल्या राजकीय पुढाऱ्यांना विचारत आहेत. राजकीय पुढारी आपापल्या नातेवाईकांना निवडून आणण्यासाठी अतोनात पैशांचा वापर सुध्दा करणार यात दुमत नाही.राजकीय पुढारी जेव्हा कार्यकर्त्यांचे मन दुःखावते तेव्हा कार्यकर्ता खचून जातो यामुळे त्याचा आक्रोश अनावर होतो अशा परिस्थितीत हाणामारी किंवा तोडफोडीच्या घटना दिसून येतात.उपोषण,एबी फॉर्म पळवापळवी, रॉकेल अंगावर घेणे हा सर्व प्रकार राजकीय पुढाऱ्यांच्या घराणेशाहीमुळे व चुकीच्या निर्णयामुळे निर्माण झालेली मोठी आणि जटील समस्या आहे.राज्यात तर काही ठिकाणी एकाच घरी तिन ते सहा लोकांना उमेदवारी दिल्याचे सांगितले जाते.यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी हाडामासाच्या कार्यकर्त्यांचा बळी घेतात हे कितपत योग्य म्हणावे !आज अनेक राजकीय पक्षांच्या आघाड्या तुटल्यात परंतु उद्याचा विचार केला तर हे सर्वच पक्ष एकत्र बसणार आणि यात नुकसान होणार प्रत्येक पक्षांच्या कार्यकर्त्यांचे.राजकीय पक्षातील प्रत्येक राजकीय पुढारी कार्यकर्त्यांना सांगतात की तुझी उमेदवारी पक्की तु चिंता करू नकोस,परंतु तसे होतच नाही व राजकीय पुढारी कार्यकर्त्यांची दिशाभूल करतात व खोटे बोलतात आणि आपल्या जवळच्या व्यक्तीला किंवा नातेवाईकांना उमेदवारी देतात. यावरून स्पष्ट होते की खोटे बोलने राजकीय पुढाऱ्यांचे प्रथम कर्तव्य आहे असे मला वाटते.सध्याची मनपा निवडणुक कार्यकर्त्यांची नसुन राजकीय पुढाऱ्यांच्या घराणेशाहीची व धनशाहीची आहे. राजकीय पुढारी घराणेशाहीला प्रोत्साहन देवून लोकशाहीला तिलांजली देण्याचे घोर पाप करीत आहे.आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारी स्वतःला त्या-त्या पक्षाचे बाहुली समजतात व कार्यकर्त्यांच्या प्रती वाटेल तो चुकीचा निर्णय घेवून कार्यकर्त्यांचा घात करतात ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक व गंभीर म्हणावी लागेल.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

## प्रबोधन

# कत्तलखान्याचे । परीक्षा हे नाव

परीक्षा विद्यार्थ्यांसाठी की विद्यार्थी परीक्षेसाठी, असा प्रश्न अलीकडे उदार शिक्षण पद्धतीचे पुरस्कर्ते विचारू लागले आहेत आणि त्यांना चाकोरीनिष्ठ शिक्षकांकडून योग्य उत्तर मिळेनासं झालं आहे. रूढिग्रस्त माणूस शिक्षक असो वा धार्मिक असो, तो रूढीला चिकटून बसलेला असतो आणि आपण काही चुकीचं करीत नाही, असा त्याचा दुराग्रही विश्वास असतो. त्यामुळेच जी माणसं मानवतावादी आहेत, दयाळू आहेत, संवेदनशील आहेत त्यांची मनं व्याकुळ होतात. खलील जिब्राननं त्यासाठी धार्मिक छळाला विटलेल्यांना संदेश देताना म्हटलं होतं, 'मनुष्यासाठी धर्म आहे, धमार्साठी मनुष्य नाही.' वरील प्रश्नाचं उत्तर म्हणूनच 'परीक्षा विद्याथ्यार्साठी असतात, विद्यार्थी परीक्षेसाठी नसतो,' हे आहे. आज परीक्षांच्या चरकात विद्यार्थी पिळून निघतो आहे, ही बाब घोर चिंता लावणारी आहे, यात वादच नाही.

थोर पुरुषांचे विचार रूढिबद्ध नसतात. त्यांना शिक्षणक्षेत्रातील या परीक्षांचा आणि फलस्वरूप मिळणाऱ्या पदव्यांचा मनस्वी तिटकारा होता. डॉ.पंजाबराव देशमुख हे थोर समाजसेवक, कर्मयोगी होते. ते म्हणतात, 'विद्यापीठाच्या मोठमोठ्या पदव्यांनी केवळ माणसाचे मोठेपण व कर्तृत्व यांचे मोजमाप होत नाही. जगातील सर्व विद्यापीठांच्या सर्वोच्च पदव्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या व्यक्तीच्या सेवेचं व कार्याचं मूल्यमापन होऊ शकणार नाही.' भाऊरावांनी स्वतः पदवीधर नसतानाही शिक्षणकायार्चा जो हिमालय स्वकर्तृत्वाने, त्यागाने उभा केला, त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. छत्रपती शाहू महाराज हे केवळ एका संस्थानाचे राजे नव्हते, तर ते नव्या युगातील उदारमतवादी, लोकशाहीनिष्ठ, समतावादी विचारवंतही होते. आपण आपलं राज्य जनतेच्या हाती लवकर द्यावं, असं त्यांना वाटे. ते म्हणाले, 'माझी प्रजा इयत्ता दुसरी शिकली, तरी मी माझं राज्य तिच्या ताब्यात द्यायला तयार आहे.' त्यांच्या व्यावहारिक मनाचा हा निष्कर्ष परीक्षांपेक्षा शहाणपणावर आधारलेला होता.

थोर पुरुषांचे विचार रूढ व्यवहाराहून भिन्न असले, तरी शिक्षण म्हटलं की आज तरी परीक्षेला पर्याय नाही. परीक्षेशिवाय विद्याथ्यार्ची ज्ञानग्रहणक्षमता, ज्ञानसंचय पातळी, ज्ञानाकलन, ज्ञानाधिकार कळू शकणारच नाही म्हणून शिक्षणव्यवस्थेने परीक्षा घेणं सुरू केलं. पण ती ज्ञानाची खरी परीक्षा नसते, हे पदापेदी अनुभवास येत असतं. उच्चशिक्षित माणसं व्यवहारात नापास झालेली दिसतात. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ न्यूटनने आपल्या घरची मांजरी व्याल्यावर बंद दाराला एक मोठं भोक आणि एक लहान भोक पाडलं आणि मांजरीच्या मागून पिल्लं घरात आल्यावर आपली चूक त्याला उमगली. नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ पेरी क्यूरींना रस्त्यातील घोडागाडी चुकवता न आल्याने त्यांचा मृत्यू झाला. जगप्रसिद्ध रँगलर रामानुजम इंग्लंडच्या थंडीत त्रिकालस्नानाने न्यूमोनिया होऊन मरण पावले. अशा ज्ञानवंताच्या व्यवहारज्ञानाची वेगळी परीक्षा घ्यायला हवी.

विद्यार्थी कसा असावा, त्याने परीक्षार्थी म्हणून काय करावं, काय करू नये, याचे नियम आहेत. पण पेपर काढणारे, पेपर तपासणारे कसे असावेत, या विषयीचे नियम अत्यल्प आहेत. प्रश्नपत्रिका पाठ्यक्रमबा' (out of syllabus) निघतात, प्रश्नपत्रिकेची काठिण्यपातळी उच्चतम असते, त्यामुळे पाच टक्के विद्यार्थी पास होऊच शकत नाहीत. या प्रकाराला कत्तलखाना असं नाव शहाणी माणसं देतात. अशा गोष्टींना जे जबाबदार असतील, त्यांना धाक घालण्याचं काम कोणी केलं आहे? मेडिकल आणि इंजिनीयरिंगच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा देताना जातीयवादी परीक्षक भेटला, की त्यांचा घात होतो. या समस्येचं चिंतनही कोणी केलेलं नाही आणि त्यावर इलाजही कोणा परीक्षा मंडळाने अथवा विश्व विद्यालयांनी योजलेले नाहीत. महात्मा फुलेंनी स्वजातीचा शिक्षक पाहिजे, असं उगाच म्हटलं नव्हतं. एकूण परीक्षक, प्राश्निक, पर्यवेक्षक, परीक्षा नियंत्रक, यांच्यामधील विद्यार्थ्यां- विषयीची अनास्था आणि बेदरकारपणा ह्या समस्या मुख्य आहेत. परीक्षांच्या बहिरंगाचा विचार जितका झाला, तितका अंतरंगाचा झालेला नाही. परिणामी, किती विद्यार्थी आणि त्यांचे पालक बळी गेले, याचा पुरेशा गांभीयार्ने विचार शिक्षणतज्ज्ञांनी करायला हवा.

परीक्षांना पर्याय नसेल, पण त्यांच्या स्वरूपांना पर्याय शोधला गेला पाहिजे. परीक्षांचा हुकूमशाही चेहरा अधिक समंजस कसा होईल, तो विकृत होणार नाही याविषयी कोणती खरबदारी घेता येईल, हे सर्व माणुसकीच्या दृष्टिकोनातून निश्चित करता आलं पाहिजे. परीक्षेच्या झाडाला वर्षातून एकदा किंवा दोनदा बहर यावा आणि इच्छुकांनी तो हंगाम साधण्याची केविलवाणी धडपड करावी, हे निरंतन शिक्षण यासारखे शब्द प्रचारात आणणाऱ्या शिक्षणव्यवस्थांना शोभून दिसणारं नाही. शिक्षण 'विद्याथीकेंद्री' असलं पाहिजे, हे तत्त्व अबाधित राहील, हे शिक्षणव्यवस्थेने सतत जागरूकपणे पाहिलं पाहिजे. कारण-

चरकात ऊस । पिळून निघतो
परीक्षार्थी तसा । त्रस्त होतो ॥ १
शिक्षार्थीचे होते । चिपाडे सुकले
तसे हाल झाले । परीक्षेने ॥ २
परीक्षका नाही । दयामाया काही
म्हणावे कसायी । क्रूर त्यांना ॥ ३
जात पाहूनिया । खाली वर नेतो
कोणा न कळतो। खेळ त्यांचा ॥४
परीक्षाफलास । म्हणती निकाल
लागतो निकाल । विद्यार्थ्यांचा ॥५
मोडीत काढावी । परीक्षाव्यवस्था
ज्ञानाठायी आस्था । तिची नाही ॥ ६
कत्तलखान्याचे। परीक्षा हे नाव
आणा अभिनव । जुन्या जागी ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मतदारसंघाची पुनर्रचना ?

**२०२६** मध्ये मुदत संपून लोकसंख्येवर आधारित मतदारसंघांची पुनर्रचना होईल म्हणजे डिलिमिटेशन होईल हा मुद्दा आता ऐरणीवर आहे. सेंट्रल व्हिस्टा चा प्रकल्प अधिकचे खासदार समाविष्ट करून घेण्यासाठी केला गेला असे देखील म्हटले जाते. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश आहे. जगाच्या एकूण जमिनीच्या २.४% भूभाग भारताकडे आहे परंतु अंदाजे १७.५% लोकसंख्या भारतामध्ये आहे. लोकसंख्या नियंत्रण हा भारताचा अनेक वर्षांपासूनचा महत्वाचा कार्यक्रम बनला आहे, सातत्याने तशा जाहिराती देखील केल्या जातात. या समस्येवर ज्यांनी काम केले, त्या राज्यांमध्ये लोकसंख्या वाढ तुलनेने कमी झाली, उलट काही राज्यांमध्ये लोकसंख्यावाढीचा दर सरासरीपेक्षा जास्त आहे. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणात मतदारसंघ बनल्यास, ज्यांनी लोकसंख्येवर नियंत्रण मिळवण्यात कमी प्रयत्न केले त्यांना जास्त जागा मिळणार, उलट ज्यांनी योग्य प्रयत्न केले त्यांना कमी मतदारसंघ असतील. ज्यांच्याकडे जास्त मतदारसंघ त्यांचे देशाच्या राजकारणावर नियंत्रण राहणार. या निकषानुसार लोकसंख्येनुसार पुनर्ररचना हा एका अर्थी 'चूक करणाऱ्यांना बक्षीस आणि योग्य काम करणाऱ्यांना शिक्षा' देण्यासारखा प्रकार आहे का?

देशाचे गृहमंत्री श्री अमित शाह यांनी मध्यंतरी एक विधान केले होते ज्यात त्यांनी म्हटले की मतदारसंघाच्या पुनर्रचनेनंतर दक्षिणेतील राज्यांमध्ये लोकसभेच्या जागा कमी होणार नाहीत. हे विधान खरे तर हास्यास्पद म्हणायला हवे कारण मुद्दा हा नाही की दक्षिणेतील राज्यांच्या जागा कमी होतील, मुद्दा असा आहे की उत्तरेतील जागा खूप वाढून दक्षिणेतील राज्यांचा एकूण जागांमधील वाटा कमी होणार. म्हणजे दक्षिणेतील राज्यांवर जुलुमच म्हणायला हवे. २००१ च्या डिलिमिटेशनमध्ये हा निर्णय २५ वर्ष थांबवला होता आणि ठरले होते की २०२५ नंतरच्या जगणनेनंतर यावर निर्णय घेण्यात यावा. २०२१ मध्ये कोविड मुळे जनगणना घेतली नाही. परंतु त्यानंतर सगळं पूर्ववत झाले, अगदी कुंभ, निवडणूक प्रचार वगैरेसारखे गर्दी जमा होणारे सर्व उपक्रम झाले परंतु जनगणना मात्र झाली नाही. २०२१ च्या जनगणनेनंतर पुढची जनगणना झाली असती २०३१ ला आणि २००१ मध्ये ठरल्याप्रमाणे २०२५ नंतरची जनगणना २०३१ ची गृहीत धरली गेली असती. परंतु आता २०२५ नंतरची जनगणना असणार आहे जी अजून झालीच नाही व जी कदाचित येत्या एकदोन वर्षात होऊ शकते. म्हणजे २०२९ च्या निवडणुकीच्या आधी डिलिमिटेशन लागू करण्याकरिता खेळली गेलेली ही चाल समजायची का ?

लोकसंख्येवर नियंत्रण हा एकमेव मुद्दा नसून, दरडोई उत्पन्न, जीडीपी, शिक्षण, समानता, स्त्री सुरक्षा, कुपोषण, सरासरी आयुर्मान यासारख्या प्रगतीच्या इतर निकषांमध्ये देखील उत्तरेतील काही राज्ये देशातील प्रगत राज्यांच्या तुलनेत खराब प्रदर्शन करत आहेत. म्हणजेच ज्यांचे बहुसंख्य निकषांमध्ये प्रदर्शन वाईट त्यांना सत्तेची चावी व देशाचे धोरण ठरवण्याचा हक्क दिला जाणार. मतदारसंघांची पुनर्रचना कशी असू शकते याचा अंदाज समजून घेऊ. सध्या भारतात ५४३ मतदारसंघ आहेत जे वाढून ८४६ होतील असा अंदाज आहे. त्यात ज्याला हिंदी पट्टा म्हटले जाते अशा उत्तर प्रदेश मध्ये १४३, बिहार ७९, मध्य प्रदेश ५२, राजस्थान ५०, झारखंड २४ व छत्तीसगड १९ एकूण ३६७ मतदारसंघ असतील. तर अनेक निकषांवर प्रगत अशा दक्षिण भारतीय पाच राज्यांमध्ये फक्त १६४ मतदारसंघ असणार. काही राज्यांमध्ये तर मतदारसंघ कमी देखील होतील, याचा अर्थ संसदेत त्यांचे प्रतिनिधित्व कमी होईल किंवा प्रतिनिधित्वाची टक्केवारी तर निश्चितपणे कमी होईल. हिंदी भाषिक उत्तर भारतीय राज्ये आणि दक्षिण भारत यांच्यातील दरी वाढण्याची अनेक कारणे आहेत उदाः सत्तेतमधील सहभाग, संस्कृती व भाषा लादली जाणे वगैरे. त्या व्यतिरिक्त एक महत्वाचे कारण आहे आर्थिक. दरडोई उत्पन्नामधील असमानता याची तुलना करायची तर गोवा व बिहार मधली तफावत ही युरोप मधील प्रगत देश व आफ्रिकेतल्या सहारा वाळवंटातील देशांच्या तफावती इतकी आहे. गोव्यातील सरासरी व्यक्तीचे उत्पन्न बिहार मधील सरासरी व्यक्तीच्या उत्पन्नापेक्षा ९००% जास्त आहे. देशांतर्गत, राज्यांमध्ये इतकी विषमता अभावानेच पाहायला मिळते. चीनच्या दरिद्री व प्रगत भागात मोठी आर्थिक विषमता आहे असे म्हटले जाते परंतु ती देखील इतकी भीषण नाही. त्यांच्यातील फरक अंदाजे ४००% चा आहे. न्यूयॉर्क हे अमेरिकेतील सर्वात संपन्न राज्य तर मिसिसिपी सर्वात गरीब. या दोन राज्यातील फरक १००% च्या आसपास आहे. ही झाली राज्यांमधील उत्पन्न विषमता. राज्यांतर्गत उत्पन्नाचे वाटप तर त्याहीपेक्षा जास्त भीषण आहे. बिहार सोबत उत्तर प्रदेश ची अवस्था देखील तशीच आहे. हा फरक विंध्य पर्वताखालील राज्ये व एकंदरीत हिंदी भाषिक राज्यांमध्ये दिसून येतो. महत्वाचे म्हणजे राज्यांमधली ही दरी गेल्या काही वर्षांमध्ये वाढलेली आहे. १९८० पासून भारतचे दरडोई उत्पन्न साधारण ७% ने वाढत आहे. पण २० वर्षांपूर्वी गोवा व बिहार यांच्या दरडोई उत्पन्नामधील फरक अंदाजे ५५०% होता. देशातील आर्थिक प्रगती मुख्यत्वे पश्चिमी व दक्षिणी राज्यात झालेली दिसते. कौशल्यावर आधारित व्यवसाय व उद्योगांची उभारणी या राज्यांमध्ये झाली याउलट, मानवी श्रम, चीप लेबर यावर आधारित रोजगार उत्तरी हिंदी भाषिक राज्यांकडे जातात. उत्पादन क्षेत्राचा देशाच्या जीडीपी मधला हिस्सा आहे अंदाजे १४% (बांगलादेश २१%, चीन २७%) परंतु ज्या उत्तर प्रदेश मध्ये देशाची १७% लोकसंख्या आहे त्या उत्तर प्रदेशचा या क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये हिस्सा आहे ९%. उत्पादन क्षेत्रातील एकूण नोकऱ्यांपैकी अध्यार्हून अधिक देशाच्या दक्षिणेतील राज्यात आहेत. ॲपल साठी उत्पादन करणाऱ्या ११ कंपन्यांपैकी फक्त १ उत्तरेत तर १० दक्षिणेत आहेत. श्रीराम सुब्रमण्यम, रिषभ कुमार आणि प्रकाश लौंगनी हे आयएमएफ संलग्न अर्थतज्ज्ञ म्हणतात की या परिस्थितीमध्ये देशांतर्गत स्थलांतर (दक्षिणेकडे) हाच एक मार्ग दिसतो. कारण समान शिक्षण, क्षमता व अगदी जात हे निकष पकडता उत्तरेकडील व्यक्ती दक्षिणेत अधिक अर्थार्जन करू शकते. याचे कारण ? राजकारणाची प्राथमिकता. उत्तर प्रदेश ची लोकसंख्या २३.५ कोटी. जर देश असता तर लोकसंख्येच्या बाबतीत जगातला ६वा देश असता. नायजेरिया २३.५कोटी लोकसंख्येने सहाव्या क्रमांकावर आहे. १९७१ च्या लोकसंख्येच्या आधारावर फायनान्स कमिशन ने संघराज्य सरकार व राज्ये यांच्यातले उत्पन्नाचे वाटप ठरवले. तेव्हा युपी लोकसंख्या अंदाजे ९कोटी होती जी ३००% वाढली. तर कर्नाटकची लोकसंख्या ३ कोटी होती जी आता ७ कोटी आहे. परंतु त्यात अंदाजे २.५ कोटी स्थलांतरित (कामगार) आहेत. मूळ लोकसंख्या अंदाजे ४.५ कोटी. म्हणजे ५०% लोकसंख्या वाढ. याचा अर्थ लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यात राज्याला यश मिळाले.

सर्वात जास्त बालमृत्यू होणारी राज्ये आहेत मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश.सर्वात कमी बाल मृत्यू असणारी राज्ये आहेत केरळ आणि तामिळनाडू. या आकडेवारीनुसार, केरळ व तामिळनाडूची तुलना युरोप मधील देशांशी तर उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश ची तुलना मध्य आफ्रिकेतील देशांबरोबर होऊ शकते. बालमृत्यू दर अवलंबून असतो त्या राज्यातल्या नागरिकांचे उत्पन्न, स्त्रियांचे सामाजिक स्थान, स्वच्छता व महत्वाचे म्हणजे आरोग्याच्या सुविधा. लोकसंख्या वाढ नियंत्रणातही केरळ तामिळनाडू सर्वोत्तम आहेत. बिहार, मध्य प्रदेश,राजस्थान, उत्तर प्रदेश आणि आता विभाजन होऊन नवीन बनलेली राज्ये झारखंड व छत्तीसगड. यांची तुलना दक्षिण भारतीय राज्ये (तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ) यांच्यासोबत केल्यास दिसते की लोकसंख्येच्या बाबतीत दक्षिण भारतीय राज्यांचा एकूण लोकसंख्येमधला वाटा १९५१ साली २६.२% होता जो २०२२ मध्ये १९.८% झाला. २०११ च्या जनगणनेपासूनच लोकसंख्या वाढीचा दर आहे, बिहार १८.१६%, झारखंड १६.७१%, मध्य प्रदेश १६.३१%, राजस्थान १५.५४%, छत्तीसगड १५.४८%, तर युपी १५.११%. याउलट दक्षिण भारतीय राज्यांचा दर आहे कर्नाटक ९.६६%, तेलंगणा ८.५६%, आंध्र प्रदेश ६.३%, केरळ ६.२७% आणि तामिळनाडू ६.०३%. कारण अर्थातच प्रजनन दर कमी ठेवण्यात आलेले यश. त्याचे कारण शिक्षण, स्त्रियांचा सहभाग व आर्थिक स्थैर्य वगैरे. १५व्या फायनान्स कमिशनने राज्यांचा करातील वाटा ४२% वरून कमी करून ४१% केला. या कमिशन मध्ये २०११ च्या जनगणनेमधील आकड्यांचा वापर केला गेला जो पूर्वी १९७१ च्या डेटाचा वापर होत असे. त्यामुळे सर्वाधिक नुकसान होणाऱ्या ५ राज्यांपैकी आसाम सोडून ४ दक्षिणी राज्ये आहेत.

आता जीएसटी मुळे आर्थिक नाड्या, हिंदी सक्तीमुळे प्रशासकीय सत्ता, डिलिमिटेशन मुळे राजकीय सत्ता वगैरे सर्व ताकद जर हिंदी भाषिक राज्यांकडे जाईल तर दक्षिणेकडील राज्यांच्या हातात काय ? या आकडेवारीनंतर करामध्ये मोठा सहभाग असताना, लोकसंख्यावाढीवर नियंत्रण मिळवले असताना दाक्षिणात्य राज्यांच्या तुलनेत हिंदी भाषिक राज्यांकडे सत्तेच्या नाड्या जात असतील आणि भाषा व संस्कृती देखील लादली जाणार असेल तर दक्षेणतील राज्यांना फसगत केल्यासारखे वाटणे हे अत्यंत स्वाभाविक आहे. योग्य वागणाऱ्याला शिक्षा व अयोग्य वागणाऱ्याला बक्षीस दिले जात असल्याची भावना दक्षेणीतील नागरिकांमध्ये वाढीला लागल्यास हा संघर्ष पुढे उग्र रूप घेऊ शकतो व संघराज्य सरकारने याची जबाबदारी टाळणे, दुर्लक्ष करणे घोडचूक ठरेल.



**श्री. सुरज सामंत**
(लेखक, व्यवसायांना धोरण सल्ला देतात.
thewisecompass@gmail.com)

# कालवा विकास कामांसाठी ७० कोटींचा निधी

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांच्या दीर्घ प्रतीक्षेला अखेर न्याय मिळाला आहे. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत प्रलंबित असलेल्या पाइपलाईन आणि कालवा विकास कामांसाठी ७० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या मंजूर निधीतून बुद्धेहाळ भरण विकास कामांसाठी २१ कोटी २७ लाख ६८ हजार असे एकूण सुमारे ७० कोटींचा महत्त्वाचा निधी सांगोला तालुक्यातील सिंचनासाठी उपलब्ध होणार आहे. अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली यांनी प्रापण सूची सन २०२५ - २६ मध्ये समाविष्ट करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार निधीची तरतूद करण्यात आली आहे. या निधीद्वारे बांधकाम व पाइपलाईन टप्प्यांची कामे करण्यात येणार आहेत. यापूर्वी या कामांच्या मंजुरी प्रस्तावांना वारंवार विलंब होत असल्याने शेतकरी वर्गामध्ये नाराजीचे वातावरण होते. मात्र आमदार देशमुख यांनी ही मागणी ठामपणे केला.

टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत सांगोला कालवा कि.मी. १ ते ५० परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात आलेल्या मागणीनुसार वाढीव पाईपलाईन व लाभक्षेत्र विकास कामांच्या संदर्भात सुमारे ७० कोटींचा महत्त्वाचा निधी सांगोला परिसरातील सिंचनासाठी उपलब्ध होणार आहे. या कामांमुळे कडलास, कोळे, सोनंद, गौडवाडी तसेच परिसरातील इतर गावांना नियमित सिंचन मिळून शेतीचे क्षेत्र आणि उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा पूर्ण होऊन कालव्यांच्या विस्तारीकरणामुळे केवळ शेतीपुरतेच नव्हे, तर पिकांची उत्पादन क्षमताही वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.. शेतकऱ्यांच्या पाणी अभावी उभ्या राहिलेल्या अनेक समस्यांना यामुळे मोठा हातभार लागणार आहे.

सांगोला तालुक्यातील टेंभू उपसा सिंचन प्रकल्पासाठी तब्बल ७० कोटींचा निधी मंजूर करून घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे शेतकरी बांधवांकडून अभिनंदन होत आहे. शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन पाणी प्रश्नाला दिलासा मिळवून देण्यासाठी त्यांनी दाखवलेली बांधिलकी व प्रामाणिक भूमिका कौतुकास्पद अज्ञेश्र. त्यांच्या प्रयत्नांमुळे कालवा व पाइपलाईन कामांना गती मिळून मोठ्या प्रमाणावर शेती क्षेत्राला लाभ होणार आहे. शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचवणे ही आमची बांधिलकी आहे. मंजूर झालेल्या निधीमुळे अपूर्ण कामांना नवसंजीवनी मिळेल आणि सिंचन व्यवस्थेला गती मिळणार आहे.



**- डॉ. बाबासाहेब देशमुख**
**आमदार, सांगोला**

# कृषी विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाण्यांचे उन्नतीकरण करावे : राज्यपाल आचार्य देवव्रत यांची कृषी विद्यापीठांना सूचना

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** : जागतिक हवामानाचे गंभीर संकट लक्षात घेऊन राज्यातील कृषी विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाणांना संस्कारित करून त्यांचे उन्नतीकरण करावे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल अशा प्रकारचे बियाणे निर्माण करावीत असे सांगताना कृषी विद्यापीठांनी राज्यात नैसर्गिक शेतीची क्रांती आणण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती आचार्य देवव्रत यांनी केले.लोकभवन मुंबई येथून कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच राज्यातील कृषी व पशुविज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरूंशी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधताना राज्यपाल बोलत होते.

बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, 'पोकरा'चे प्रकल्प संचालक परिमल सिंह, राज्यातील कृषी तसेच पशुविज्ञान विद्यापीठांचे कुलगुरु, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, 'आत्मा' चे संचालक सुनील बोरकर व कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संकरीत बियाणे शेतकऱ्यांसाठी संकट असून ते महाग देखील आहे. त्यांचा वापर केल्यास रासायनिक खते देखील जास्त लागतात. उत्पादित अन्नधान्याला चव नसते व त्याचे पोषणमूल्य देखील कमी असते. त्यामुळे कृषी विद्यापीठांनी पारंपरिक बियाण्यांवर संशोधन करुन त्याचे उन्नतीकरण करावे, असे राज्यपालांनी सांगितले.

सर्व कृषी विज्ञान केंद्रांनी नैसर्गिक शेतीच्या प्रचार प्रसारासाठी 'मॉडेल फार्म' विकसित करावे व शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी असे राज्यपालांनी सांगितले. नैसर्गिक शेती ही लोकचळवळ झाली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी



यावेळी व्यक्त केली. नैसर्गिक शेती हे पवित्र असे ईश्वरी कार्य आहे. भावी पिढ्यांच्या अन्नसुरक्षेसाठी जमिनीचा पोत सुधारायचा असेल तर नैसर्गिक शेतीशिवाय गत्यंतर नाही. बरेचदा शेतकरी थेट दुकानदारांकडे जाऊन दुकानदार सांगतील त्या प्रमाणात युरिया, डीएपी, कीटकनाशके खरेदी करतात व शेतात वापरतात. त्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे. या दृष्टीने विद्यापीठांनी शेतकऱ्यांचे प्रबोधन करावे असेही राज्यपालांनी सांगितले. गुजरात मधील चार कृषी विद्यापीठे गेल्या तीन वर्षापासून नैसर्गिक शेती या विषयावर संशोधन करीत आहे. त्यामुळे राज्यातील विद्यापीठांनी त्या विषयावर नव्याने संशोधन सुरु न करता गुजरातमधील संशोधन पुढे न्यावे. त्यांनी तयार केलेल्या संशोधन पत्रिका व पुस्तके राज्यातील विद्यापीठांना उपलब्ध करून देऊ असे राज्यपालांनी सांगितले.आपण अलीकडे गावागावांमध्ये जाऊन लोकांमध्ये नैसर्गिक शेतीबाबत जनजागृती करीत आहोत, असे राज्यपालांनी सांगितले. अशाच एका भेटीमध्ये आणंद जिल्ह्यात २५ गावांमध्ये आज भूमिगत जलस्त्रोतांमध्ये नायट्रेट आढळून आले असून पाणी पिण्यायोग्य राहिले नाही, ही गोष्ट निदर्शनास आली. दूषित पाण्यांमुळे लोकांना गंभीर आजार होत आहेत. या दृष्टीने रसायनांच्या वापराबाबत जागृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याकडे एक गाय असली तरी देखील शेती करता येते हे त्यांना पटवून द्यावे लागेल. महाराष्ट्रात साहिवाल, थारपारकर, कांकरेज, गीर आदी देशी गायींचे संवर्धन केले गेल्यास ते शेतीला वरदान ठरेल व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल असेही राज्यपालांनी सांगितले. यावेळी 'आत्मा'चे संचालक सुनील बोरकर यांनी सादरीकरण केले.

आपण महाराष्ट्रात नैसर्गिक शेती विषयावर घेतलेल्या दोन परिसंवादानंतर कृषी विभाग व विद्यापीठांनी हे कार्य सकारात्मक पद्धतीने हाती घेतले याबद्दल राज्यपालांनी समाधान व्यक्त केले.

## वात्रटिका

### विकास आणि प्रगती

उघडून डोळे भोवती
जरा बघा तुम्ही नीट...
किळस येईल आणि
येईल तुम्हाला वीट...
कुठे आहेत गळ्यात गळे
आणि कुठे आहे युती...
विरोधक उरलाच नाही
हाच विकास नि हिच प्रगती...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# उजनी ऑर्चर्डस फार्मर प्रोड्युसर कंपनीची यशोगाथा

## शेतकऱ्यांच्या केळीची थेट निर्यात

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण परिसरातील युवा शेतकऱ्यांनी एक नवा इतिहास रचला आहे. आपला माल आपणच विकायचा या हेतूने वाशिंबे ता.करमाळा येथील उजनी ऑर्चर्डस फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या युवा संचालकांनी किंग बनाना एक्सपोर्ट कंपनीच्या माध्यमातून दर्जेदार केळींची निर्यात करून थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठ गाठली आहे. ही कंपनी शेतकरी-मालकीची असून, युवा शेतकरीच्या नेतृत्वाखाली ती कार्यरत आहे. या यशामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये नवीन उत्साह निर्माण केला असून,भारतीय शेतीच्या जागतिक स्तरावरील क्षमतेचा पुरावा मिळाला आहे.

उजनी ऑर्चर्डस फार्मर प्रोड्युसर कंपनी ही एप्रिल २०२५ मध्ये स्थापन झालेली कंपनी असून कामाचे मुख्यालय वाशिंबे, ता. करमाळा, जि. सोलापूर येथे आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक हर्षवर्धन झोळ यांच्या नेतृत्वाखाली युवा शेतकरी संचालकांची टीम कार्यरत आहे. वाशिंबे केळी पिकाच्या उत्पादनात समृद्ध तसेच वेलची केळीचे हब तयार झाले आहे.सर्व तरुण शेतकरी पारंपरिक शेतीतून आधुनिक निर्यात-केंद्रित व्यवसायाकडे वळले आहेत. उजनी धरणाच्या सिंचनामुळे समृद्ध असलेल्या या भागातील काळ्या मातीमध्ये उगवलेल्या कॅव्हेंडिश प्रकारच्या (ग्रँड जैन - जी९, विल्यम्स ) केळींची त्यांनी निर्यात सुरू केली आहे. कंपनीने किंग बनाना ( King Banana ) हे ब्रँड विकसित केले असून, त्याअंतर्गत केळींची निर्यात होत आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२५ मध्ये इराक, इराण, सौदी अरेबिया, ओमान,येथे केळींच्या कंटेनर पाठवण्यात आले. या केळींची




वैशिष्ट्ये म्हणजे नैसर्गिक गोडवा, १२-२० दिवसांचा शेल्फ लाइफ, १८-२२ सेमी लांबी आणि ३६-४२ मिमी व्यास. दरमहा १२० मेट्रिक टन क्षमता असलेल्या या कंपनीकडे एपीईडीए,एफएसएसएआय आणि ॲगमार्क प्रमाणपत्रे आहेत.

निर्यात प्रक्रियेत शेतापासून जहाजापर्यंत पूर्ण पारदर्शकता आणि शाश्वत पद्धतींचा अवलंब केला जातो. शीतसाखळी, स्वच्छता आणि आंतरराष्ट्रीय मानकांनुसार पॅकेजिंग यामुळे या केळी जागतिक बाजारात लोकप्रिय होत आहेत. अवघ्या २ महिन्यात आतापर्यंत २१ कंटेनर एक्सपोर्ट केले आहे आहेत. कंपनीच्या वतीने ओमान, दुबई,सोंदी अरेबिया, इराकमध्ये विदेशी दौरे करून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील संपूर्ण माहिती मिळाली आहे.कंपनीचे संचालक शेतकरी यांची शेतीविषयक माहिती संकलित साठी महाराष्ट्र राज्य शासना मार्फत विदेशी दौऱ्यात निवड झाली आहे.

अनेक शेतकरीची उच्च दर्जाची केळी घेऊन थेट निर्यात केली, ज्यामुळे चांगला भाव मिळला. शेतकऱ्यांच्या FPC कंपनीने निर्यात करून यश मिळवले आहे.पुढेही हा प्रवास सुरू राहील.

शेतकरी उत्पादन कंपनी म्हणजे सरकारची योजना नव्हे, तर शेतकऱ्यांच्या हाती सत्ता देणारे साधन आहे. जर शेतकरी एकत्र आले, योग्य नियोजन करून,दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवला, तर ग्रामीण भागातूनही मोठे, शाश्वत आणि यशस्वी उद्योग उभे राहू शकतात.

शेतकरीनीं स्वतःवर विश्वास ठेवला, तर शेतीतूनही उद्योग घडतो. टिम किंग बनाना एक्सपोर्ट कंपनीने साध्य करत आहे.

"आम्ही शेतकरी आहोत आणि आमच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. उजनी परिसरातील अनेक शेतकऱ्यांना याचा फायदा होईल," असे संचालक सुभाष झोळ यांनी सांगितले. कंपनी भविष्यात आंबा, डाळिंब, कांदा, नारळ यांचीही निर्यात करण्याच्या तयारीत आहे.

या यशामुळे आमच्या ग्रामीण शेती क्षेत्रात नवीन क्रांतीची सुरुवात झाली आहे. सरकारच्या योजनांच्या मदतीने अशा युवा उद्योजकांना प्रोत्साहन मिळले. उजनी ऑर्चर्डसची ही कहाणी इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

# ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या युवक अध्यक्षपदी संदीप राठोड यांची निवड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ऑल इंडिया बंजारा सेवा संघाच्या सोलापूर जिल्हा युवक अध्यक्षपदी दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती भामला तांडा येथील तरुण कार्यकर्ते संदीप धोंडीराम राठोड यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बापूराव राठोड यांनी करून त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान केले.



संदीप राठोड हे अभियांत्रिकी पदवीधर असून बंजारा समाजात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध मूलभूत समस्यांच्या सोडवणुकीसाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. युवकांना संघटित करून समाजाच्या विकासासाठी दिशा देण्याचे काम त्यांनी आतापर्यंत केले असून त्यांच्या कायार्ची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या निवडीबद्दल अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप अण्णा राठोड, मोतीराम भाऊ राठोड, लाला भाऊ राठोड, लालसिंग राजपूत सर, सुनील कळके यांच्यासह अनेक मान्यवरांनी संदीप राठोड यांचे अभिनंदन केले आहे. तसेच पुढील काळात बंजारा समाजाच्या संघटनात्मक कार्यासाठी त्यांनी प्रभावीपणे नेतृत्व करावे, अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

जिल्हा युवक अध्यक्ष म्हणून संदीप राठोड युवकांना संघटित करून समाजाच्या हक्कांसाठी, शिक्षण, रोजगार व सामाजिक विकासासाठी सक्रिय भूमिका बजावतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या निवडीमुळे बंजारा समाजातील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून संघटनेच्या कार्याला नवी ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# जिजाऊ ज्ञान मंदिरात 'आनंद बाजार' उत्साहात

**कोंडी (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच उद्योग-व्यवसायाचे कौशल्य, व्यवहारज्ञान आणि स्वावलंबनाची भावना निर्माण व्हावी, या विधायक उद्देशाने जाणता राजा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, कोंडी संचलित जिजाऊ ज्ञान मंदिर संकुलात 'आनंद बाजार' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वी ठरला.

या आनंद बाजाराचे उद्घाटन कोंडी गावच्या सरपंच सौ. सुहासिनी निंबाळकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी पालक समितीच्या अध्यक्ष अर्चना गुंड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता-राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सरपंच सुहासिनी निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारज्ञान आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी आयोजित केलेल्या या आनंद बाजाराचे विशेष कौतुक करत सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. ह्वअशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच जीवनोपयोगी कौशल्ये मिळतात,ह्व असे त्या म्हणाल्या.



फूड फेस्टिवलच्या स्वरूपातील या आनंद बाजारात विद्यार्थ्यांनी सुमारे ७० स्टॉल्स उभारले होते. अवघ्या दोन ते तीन तासांत तब्बल १ लाख ३० हजार २२० रुपयांची उलाढाल झाली. विशेष म्हणजे, सुगंधी दूध आणि थंडगार लस्सीच्या विक्रीला प्रचंड प्रतिसाद मिळाला. यामध्ये दर्जेदार व विक्रमी विक्री करून विद्यार्थी गुरुराज भोसले याने प्रथम क्रमांक पटकावला.

आनंद बाजारात वडापाव, चटकदार भेळ, बटाटा-कांदा भजी, भेळपुरी, पाणीपुरी, सँडविच, मसाला पापड, सुगंधी दूध, शेंगा लाडू, विविध ज्यूस, उसाचा रस, लांबोटी चिवडा, चायनीज पदार्थ, ढोकळा, इडली-सांबर, आईस्क्रीम अशा अनेक पदार्थांना खवय्यांची मोठी गर्दी लाभली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ म्हणाले,

'स्वाद आणि संस्कृतीचा उत्सव म्हणून दरवर्षी हा आनंद बाजार घेतला जातो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्य, स्वावलंबन आणि सद्भावना या गुणांचा विकास होतो. आनंद बाजार म्हणजे केवळ मजा नसून, यातूनच व्यवहारज्ञान, उद्योगज्ञान आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते.'

यावेळी त्यांनी उद्योगविश्वात कठोर परिश्रमातून यश मिळवलेल्या धीरूभाई अंबानी यांचे उदाहरण देत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

या उपक्रमात पालक व शिक्षकांनीही उत्साहाने सक्रिय सहभाग घेतला.

विशेषतः जिजाऊ ज्ञान मंदिरातील पाचवीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर विक्री करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आनंद बाजाराचा हा दिवस विद्यार्थ्यांसह सर्वांसाठी एक गोड आणि प्रेरणादायी आठवण ठरला.

कार्यक्रमासाठी विकास जाधव, तुकाराम पाटील, आप्पा भोसले, प्राचार्य सुषमा नीळ, मुख्याध्यापिका अर्चना औरादे यांच्यासह सहशिक्षक वृंद उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब नीळ यांनी केले, तर मुख्याध्यापक वैभव मसलकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# नाळेवस्ती शाळेस पालकांकडून नववर्षाची अनोखी भेट

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळेवस्ती या शाळेसनाळेवस्ती वेणेगाव चे प्रसिद्ध बागायतदार संतोष नाळे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी एलईडी टीव्ही भेट दिला. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात



स्पर्धेत टिकून राहण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि मराठी शाळा टिकवून ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणेगरजेचे आहे ही गरज ओळखून त्यांनी वाढदिवसानिमित्त शाळेला ही नववर्षानिमित्त अनोखी भेट दिली.

यावेळी शाळेत मुख्याध्यापक सुमन कुटे मॅडम, रणजीत नाळे ,केलास नाळे,सुशिलकुमार नाळे ,रतन खोटे उपस्थित होते. सर्वांनी दादांचे या सहकार्याबद्दल आभार मानले व समाजातील इतर घटकांनीही प्रेरणा घ्यावी अशी इच्छा व्यक्त केली.

# एन बी नवले सिंहगडच्या वार्षिक क्रीडा सप्ताहास प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा सप्ताहाचे अर्थात एन्थुझियाझ्र2ङ25 चे माजी विद्यार्थी तथा आंतरराष्ट्रीय तलवारबाजी खेळाडू श्वेतांबरी मालप - होमकर यांच्या हस्ते सुरुवात झाली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा व शारीरिक तंदुरुस्तीला महत्त्व देण्याच्या उद्देशाने कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली या क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यात मुलींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला.

सर्व क्रीडा प्रकारात मुलींनी हिरिरीने सहभाग नोंदविला आहे. या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटक श्वेतांबरी मालप- होमकर यांनी आपण याच सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातून इंजिनिअरिंग पूर्ण केल्याचे सांगत याच महाविद्यालयाच्या योगदानामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले असल्याचे सांगितले. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्यासह सर्व विभाग प्रमुखाचे वेळोवेळी सहकार्य लाभल्याचे नमूद केले.

यावेळेस माजी कुलगुरू तथा



सीआरटीडीचे संचालक प्रा. एस. एच. पवार, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. आर. टी. व्यवहारे, निबंधक डॉ. डी. आय. नवले, पब्लिक स्कूलच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांची उपस्थिती होती. संपूर्ण क्रीडा सप्ताहाचे नियोजन व अंमलबजावणी डॉ. के. सी. मुजावर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

ENTHUSIA-2K25 अंतर्गत क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी, फुटबॉल, खो-खो, हॉकी, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, ॲथलेटिक्स आदी विविध मैदानी व मैदानी क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे.

क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण व क्रीडावृत्ती विकसित होण्यास मदत होते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. एठळलवरक्अ-2ङ25 क्रीडा सप्ताह यशस्वी करण्यासाठी प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

**रक्तदान शिबिरात 70 जणांचे रक्तदान**

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळचे चेअरमन प्रा. एम. एन. नवले सर यांच्या वाढदिवसानिमित्त 30 डिसेंबर रोजी रक्तदान शिबीर आयोजित केले. यात 70 शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी रक्तदान केले.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज नं. ४२/२०२५

**मोहोळ येथील मे.सिव्हील जज्ञ ज्युनिअर डिव्हीजन साो, यांचे कोर्टात**

१) श्रीमती सुनंदा दयानंद लोंढे
वय ५५ वर्षे, धंदा घरकाम,
२) श्री. अभिजीत दयानंद लोंढे
वय ३० वर्षे, धंदा- शिक्षण,
३) क्षितीजा दयानंद लोंढे
वय - ३३ वर्षे, धंदा घरकाम,
सर्व रा. पापरी, ता. मोहोळ,जि. सोलापूर
४) सौ. पुजा महेश शिंदे
वय - ३२ वर्षे, धंदा घरकाम,
रा. स. नं. ६, प्लॉट नं. ५८, केशवनगर,मुंढवा, पुणे,
}अर्जदार

**विरुध्द**

कोणी नाही }सामनेवाला


अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मयताचे वारसप्रमाणपत्र मिळणेकामी या मे.कोर्टात दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ४ चे वडिल म्हणजेच दयानंद अर्जुन लोंढे हे दि.१०/११/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतांना कायदेशीर दुसरे कोणीही वारस नाहीत.

त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, दयानंद अर्जुन लोंढे हे राज्य परिवहन सोलापूर विभाग येथे शिपाई या पदावर कार्यरत होते. परंतु दयानंद अर्जुन लोंढे हे दि.१०/११/२०२२ रोजी मयत झाल्यामुळे मयतांना अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारस असल्याने त्यांच्या मृत्युपश्चात राज्य परिवहन सोलापूर विभाग यांचेकडे शासकीय लाभ व पेन्शन मिळणेसाठी व अर्जदार नं.२ यांना अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून घेणेबाबतचा अर्जदार यांनी राज्य परिवहन सोलापूर विभाग यांचेकडे अर्ज केला त्यांना मे. कोर्टातून वारस दाखला आणणेबाबत दि.०७/०४/२०२५ रोजी लेखी पत्र देवून सांगीतले. त्यामुळे अर्जदारास सदरचा अर्ज दाखल करणे क्रम पात्र व तसे जाहिर होवुन मिळणेसाठी अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देणेबाबत कोणाचीही काहीही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी त्यांची तक्रार व हरकत या न्यायालयात नेमलेली ता.११/०२/२०२६ रोजी अथवा सदरचे प्रसिध्दीकरण झालेपासून ०१ महिन्याचे आत दाखल करावी. अन्यथा पुढील योग्य ती चौकशी करुन अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देणेबाबत योग्य तो आदेश केला जाईल त्याची नोंद घ्यावी. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे.

ता.०२/०१/२०२६

**क.लिपिक** (शिक्का) **सहा. अधिक्षक**
**दि.फौजदारी न्यायालय मोहोळ**

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) राधाकृष्ण विखे-पाटील यांचा माजी खासदार असलेला मुलगा २) पाऊस (इंग्रजीत) ३) संशय (हिंदीत) ४) लहान बाळाचे पाळण्यात नाव ठेवणे, बारसे ५) घाण, ** कचरा ६) बाजारात मिळणारे एक तयार गोड सरबत ७) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ८) उलटी, ओकारी ११) शपथ (हिंदीत) १४) ऐकण्याचे इंद्रिय १७) पत्र १९) मुलीचा पती २०) बदक (इंग्रजीत), कड उलट लिहा २१) रात्र (इंग्रजीत) २३) नरक २४) एक हजार कि.ग्रॅ. म्हणजे एक ** २५) कुत्र्याचा जोडीदार २६) विक्षिप्त असे वर्तन करणारा २७) पावसापासून संरक्षणासाठी ही वापरतात ३०) वरल्या मनाने, वरवर ३२) भव्य मोठे, सांगलीतील कॉंग्रेसचे लोकसभा खासदार -*** पाटील ३८) पातळ कालवण ३९) फेब्रुवारी (हिंदीत) ४०) टाकाऊ कागद ४१) दुर्ग, किल्ला ४२) सनरायझर्स हैद्राबाद टीममधील फिरकी गोलंदाज-*** खान ४४) अकरा (इंग्रजीत) ४५) क्रिकेटमधील चौकार (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) एक भारतीय निवृत्त डावखुरा फलंदाज ५) चेन्नई सुपर किंग्ज टीममधून खेळलेला एक अष्टपैलू माजी महाराष्ट्रीयन खेळाडू ९) सीतेचे वडील-राजा *** १०) एक रास १२) बॉंब (हिंदीत) १३) पौष्टीक, कसयुक्त १४) अक्षराच्या मागे येणारी उभी रेष १५) पैसा, संपत्ती १६) भारतीय फलंदाज-*** कोहली १८) मुस्लिम बांधवांचा पवित्र सण किंवा पवित्र महिना २०) जेवणाचा टिफिन (मराठीत) २१) श्वसनेंद्रिय २२) विमान चालविणारा २५) छ. संभाजी महाराजांच्या आईचे नाव २८) खेळाडूंचा संघ (इंग्रजीत) २९) आश्चर्य ३१) वडाच्या झाडाचे स्त्रिया पूजन करतात तो सण ३३) सल उलट लिहा ३४) याच्यापासून शिरा बनवितात ३५) दहा (हिंदीत) ३६) हात, वस्तूवरील टॅक्स (मराठीत) ३७) भुईमुगाच्या शेंगेचे किंवा फळावरील आवरण ४०) धावणे (इंग्रजीत) ४१) फळातील गाभा ४३) कथेचा मूळ आशय, रसा उलट लिहा ४५) कालवण किंवा इतर पदार्थ बनविताना तेलात सर्व मसाला भाजून घेण्याची क्रिया ४६) एक म्हण-होता जिवा म्हणून वाचला ** ४७) लाकडाचे गोदाम ४८) राष्ट्रवादीचे सुप्रिमो-*** पवार ४९) मुस्लिम बांधवाचा एक सण ५०) माफी मागणे (इंग्रजीत)

## सुडोकु - 137

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 7 | | | | | | |
| | 3 | 1 | | | 2 | 4 | | |
| | 4 | | | | | | 5 | 2 |
| 9 | 6 | | 4 | 1 | | 8 | 7 | |
| 1 | | | 7 | | 3 | 9 | 2 | |
| | | 4 | 9 | | 8 | 1 | | |
| 4 | | 6 | 1 | | 7 | 2 | 3 | |
| 7 | 5 | 3 | | | | | 9 | 1 |
| | 1 | | | | 6 | 5 | | |

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निवीदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१ दि.१८/१०/२०२३

**परिशिष्ट - ३**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११ (महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)**
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली
**कार्यकारी अभियंता, म्हैसाळ पंपगृह विभाग. २ सांगली**
ई-मेलपत्ता:- mphdn2@gmail.com, दूरध्वनी क्र-०२३३-२३०२८८०

**ई- निविदा सूचना क्र. ०१ सन २०२५-२६ (व्दितीय सुचना)**
Main Portal : https://mahatenders.gov.in

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता म्हैसाळ पंपगृह विभाग. २ सांगली जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

ठेवला निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, म्हैसाळ पंपगृह विभाग. २ सांगली यांनी राखून आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प म्हैसाळ उपसा सिंचन योजना - जत भाग - जत कालवा कि.मी. कृष्णा ५३ ते ८१ व जत शाखा कालवा वरील सर्व सिंचन व्यवस्थापन कामे. ता. जत जि. सांगली वर्ष २०२५- २६ करीता. | रू.२५.४५ |
| २ | कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प म्हैसाळ उपसा सिंचन योजना - जत भाग - बिळूर कालवा भाग १ व २ सर्व वरील सिंचन व्यवस्थापन कामे वर्ष २०२५-२६ करीता. | रू.१६.९५ |
| ३ | कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प म्हैसाळ उपसा सिंचन योजना-जत भाग- सांगोला वितरीका १ व २ सर्व वरील सिंचन व्यवस्थापन कामे वर्ष २०२५-२६ करीता. | रू.१२.७२ |
| ४ | कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प म्हैसाळ उपसा सिंचन योजना जट भाग- मंगळवेढा वितरीका क्र.१ व २ वरील सर्व सिंचन व्यवस्थापन कामे वर्ष २०२५-२६ करीता. | रू.८.४८ |

ई निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०२/०१/२०२६ ते दिनांक ०९/०१/२०२६
ई निविदा उघडणे :- दिनांक १२/०१/२०२६ दु. १२.००.वा.

जा.क्र.म्हैपंगृविक्र/निविदा/लेशा-२/२५०८/२०२५
म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.२,सांगली
दिनांक - २९/१२/२०२५

**सही/-**
**(का.ला. मासाळ)**
**कार्यकारी अभियंता,**
**म्हैसाळ पंपगृह विभाग क्र. २, सांगली**

जिमाका/सो/जाहि/२६८/२०२५-२६

# मनसे नेते धोत्रेंच्या पाठीवर राज ठाकरेंची कौतुकाची थाप



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** नुकत्याच पार पडलेल्या पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीत तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे मार्गदर्शक म्हणून मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे भाजपा प्रणित परिचारक गटाची गेली चार दशकाची सत्ता उलथवून लावली. ऐतिहासिक विजय मिळवत नगराध्यक्षसह प्रभाग क्रमांक १७ मधून मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या पत्नी माधुरी धोत्रे यांचा नगरसेविका म्हणून विक्रमी मताने विजय झाला. यानंतर मुंबई येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी भेट घेतली. राज ठाकरे यांची दिलीप धोत्रे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन अभिनंदन केले. पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी भाजपा प्रणित परिचारक आघाडी विरुद्ध सर्वपक्षीय तीर्थक्षेत्र विकास आघाडी मध्ये प्रमुख लढत झाली होती. यामध्ये तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह मनसेच्या नगरसेवक पदाच्या उमेदवाराला येथील नागरिकांनी विक्रमी मतांनी निवडून दिले. या निवडणुकीत मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी महत्वाची भूमिका बजावल्याने पंढरपूर नगरपालिकेत गेली ४० वर्षानंतर सत्तांतर झाले आहे. पंढरपुरात मनसेची ताकद अधिकच वाढली आहे. या यशानंतर नुकतीच मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी मुंबई येथे राज ठाकरे यांची भेट घेतली.

**राज ठाकरे पंढरपुरात कार्यकर्त्यांना भेटणार**

पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीबाबत दिलीप धोत्रे यांच्याशी राज ठाकरे यांनी सविस्तर चर्चा केली. विजयाची घोडदौड आगामी काळातही सुरुच ठेवावी. वेळप्रसंगी पंढरपूर येथे भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असल्याचे ठाकरे यांनी सांगितल्याचे धोत्रे यांनी सांगीतले.

# जयशंकर सुपर मार्टचे ४ जानेवारीला उद्घाटन

**खेळ पैठणीचा कार्यक्रम**



**पोखरापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथील जयशंकर सुपर मार्टच्या उद्घाटन सोहळ्यानिमित्त परिसरातील महिलांसाठी न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम लांबोटी येथे रविवार, दि. ४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्या विमलताई तानाजीराजे खताळ व अक्षय खताळ जयशंकर शेजारी, लांबोटी येथे सिनेअभिनेता क्रांतीनाना मळेगांवकर व बालगायिका सह्याद्री मळेगांवकर यांचा न्यू होम मिनिस्टर, खेळ पैठणीचा हा महिलांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

प्रथम विजेत्यास स्कुटी, द्वितीयसाठी फ्रीज तर तृतीय बक्षीस म्हणून एलईडी टीव्ही ठेवण्यात आला. सायंकाळी ५ वाजता हॉटेल आहे. सहभागी महिलांमधून जम्बो यांनी दिली. लकी ड्रॉ काढण्यात येणार असून त्यासाठीही विविध १०१ बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

कार्यक्रमात उपस्थित महिलांनाही जयशंकर सुपर मार्टमध्ये वर्षभर १० टक्के सवलतीच्या दराने खाद्यपदार्थ खरेदी करता येणार आहेत. ३१ डिसेंबर पर्यंत महिलांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहन आयोजक विमलताई खताळ यांनी केले आहे.

# वर्षाआरंभा निमित्त अन्नछत्र मंडळाकडून उत्कृष्ट नियोजन

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** वर्षाआरंभा निमित्त अक्कलकोटमध्ये पुणे, मुंबईसह देश-विदेशातून भाविक आलेले होते. अन्नछत्र न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाकडून येणाऱ्या भाविकांसाठी उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. न्यासाकडून अन्नदानाची वेळ वाढविली होती.

अन्नछत्र मंडळात दिवसात १ लाखांहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आहे.वर्षीआरंभी भाविकांच्या गर्दीने सर्वोउच्चांक गाठला आहे.



**न्यासाचे नेटके नियोजन :**

बाहेर गावामधून आलेल्या वाहनांची मैंदर्गी, बसलेगाव, व शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची दुर्तफा गर्दी होत होती. हे लक्षात घेऊन न्यासाच्या मैंदर्गी रस्त्यावरील गेटने भाविकांना बाहेर जाण्यासाठी रस्ता मोकळा करण्यात आल्यामुळे वाहनांची गर्दी कमी झाली. न्यासाने पार्किंगची व्यवस्था चोख केलेली होती. नेहमीच भक्तांना सुविधा देण्यामध्ये न्यास हे अव्वल असून भक्तांना कोणत्याच अडचणी येता कामा नये आशा उपाययोजना व दक्षता घेत असल्याने भक्तांना सुखकर पद्धतीने महाप्रसादाचा लाभ मिळाला.

# अकलूज आगारात रस्ता सुरक्षितता अभियान उत्साहात सुरू




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** १ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत, अकलूज आगार सोलापूर विभाग राज्य परिवहन महामंडळ मार्फत, रस्ता सुरक्षितता अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानाची औपचारिक सुरुवात १ जानेवारी रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अश्विनकुमार पोंदकुले यांच्या अनमोल मार्गदर्शनाने झाली .

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे एआरटीओ अश्विनकुमार पोंदकुले, मोटार वाहन निरीक्षक सचिन झाडबुके, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शीतल शिंदे, हे उपस्थित होते. त्याचबरोबर अकलूज आगाराचे, आगार व्यवस्थापक प्रमोद शिंदे, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक राजेंद्र राऊत, स्थानक प्रमुख दत्तात्रय रायबान वरिष्ठ लिपीक रविराज भांगे, वरिष्ठ लिपीक लक्ष्मण बानेवाड, यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी, चालक, वाहक व यांत्रिकी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी चालक व वाहक यांना रस्ता सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. वाहन चालवताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन, वेगमर्यादा पाळणे, सिग्नलचे पालन, मद्यपान करून वाहन न चालवणे, मोबाईलचा वापर टाळणे तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.

मार्गदर्शन करताना मान्यवरांनी सांगितले की, वाहतूक नियमांचे पालन करणे हे केवळ कायद्याचे बंधन नसून समाजहितासाठी अत्यावश्यक आहे. नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊन मानवी जीविताची हानी टाळता येते व सार्वजनिक वाहतूक अधिक सुरक्षित व विश्वासार्ह बनते.

सार्वजनिक वाहतुकीतील चालक व वाहक यांच्यावर मोठी जबाबदारी असून त्यांच्या दक्षतेवर अनेक प्रवाशांचे प्राण अवलंबून असतात.

त्यामुळे सुरक्षित, संयमी व जबाबदार वाहनचालन ही काळाची गरज असल्याचे नमूद करण्यात आले.

यावेळी विना अपघात सुरक्षित सेवा देणाऱ्या चालकांचा तसेच बसची यांत्रिक देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी यांचा मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कारामुळे कर्मचारी वर्गामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व समारोप वरिष्ठ लिपीक रविराज भांगे यांनी केले तर प्रास्तविक आगार व्यवस्थापक प्रमोद शिंदे यांनी केले.

# भविष्यात एखादा विद्यार्थी अब्दुल कलाम घडू शकतो- राम सातपुते



असाध्य गोष्ट जर साध्य करायचे असेल तर त्यासाठी संघर्ष अभ्यास करावा लागेल आणि त्या कष्टांना योग्य दिशा द्यावी लागेल. नाहीतर पोरगं काय करायला गेले की बापाने सांगायचे अंथरून पाहून पाय पसर, पोरगं हातपाय खोडून मरून गेलं पण बापाने पाय पसरू दिले नाहीत. बापाने तर सांगितले पाहिजे. हातपाय पसर अंथूणार्चे काय ते तुझा बाप बघेल एवढी धमक आम्हाला आमच्या लेकरा मध्ये निर्माण करता आली पाहिजे. स्वाभिमान येतो तो आत्मविश्वासातून ज्ञानग्रहण करा कौशल्य आत्मसात करण्यासाठी अपेक्षित असणारा आत्मविश्वास तुमच्यात असला पाहिजे.

**प्रा. गणेश शिंदे ( प्रमुख व्याख्याते )**

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना जर शिक्षकांनी पंख लावले तर अशक्य काही नाही उद्याच्या भविष्यामध्ये चांगले विद्यार्थी घडतील या देशाला वेगळ्या उंचीवर घेऊन जातील विद्यार्थी म्हणजे उद्याचा भारत आहे यांच्यामध्ये आपण संस्काराची पेरणी केली चांगले विद्यार्थी घडविले तर निश्चित यातून भविष्यात एखांदा विद्यार्थी अब्दुल कलाम घडू शकतो असे प्रतिपादन मा. आ. राम सातपुते यांनी केले.

ते नातेपुते एज्युकेशन सोसायटीच्या ७० व्या वर्धापन दिन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभा प्रसंगी बोलत होते.ते पुढे बोलत असताना म्हणाले की, एखादे रोपटे लावणे, त्याचे वटवृक्ष होणे याच्यामध्ये जर विचार केला तर अनेकांनी याच्यासाठी स्वतःचे जीवन, वेळ समर्पित केलेला असतो. त्यानंतर एखादी संस्था उभा राहते व ती टिकते. अनेक पालक या प्रशालेमध्ये शिकले आहेत. इंग्रजी माध्यमाच्या काळामध्ये सुद्धा या ठिकाणी या प्रशाले वरती श्रद्धा असणाऱ्या पालकांनी आपली मुलं या दाते प्रशालेमध्ये ठेवले आहेत. शाळेचे संचालक मंडळ चांगल्या पद्धतीने ही शाळा चालवत आहेत. गावाला शाळेबद्दल वेगळी अस्था आहे. विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारत अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा व आपली प्रशाला विद्यार्थ्यांनी स्वच्छ ठेवावी.दाते प्रशालेने अधिकारी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, वकील, डॉक्टर असे अनेक लोक या घडविले या घडवण्यामध्ये त्या काळाच्या शिक्षकांचा सिंहाचा मोठा वाटा असल्याचे मत मा.आ.राम सातपुते यांनी व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. राम सातपुते प्रमुख व्याख्याते गणेश शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बाहुबली चंकेश्वरा तसेच अँड. डी. एन. काळे, धैर्यशील देशमुख संतोष काळे जनरल सेक्रेटरी अँड शिवाजीराव पिसाळ संचालक डॉक्टर एम पी मोरे अरविंद पाठक महेश शेटे डॉक्टर वर्धमान जोशी संजय कुमार गांधी जवाहर इंगोले इमाम मुलानी मुख्याध्यापक विनायक देशपांडे प्राथमिक विभाग मुख्याध्यापक कुंडलिक इंगळे उपप्राचार्य भारत पांढरे भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भैय्यासाहेब चांगण नातेपुते शहराध्यक्ष राजेंद्र पांढरे बाळासाहेब पांढरे संजय उराडे आदी. मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख रकमेची बक्षिसे देण्यात आली.मुख्याध्यापक विनायक देशपांडे यांनी आई-वडिलांच्या स्मरणार्थ शाळेला दीड लाख रुपयांचे डिजिटल लॅब उपलब्ध करून दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद परचंडे यांनी केले असून प्रास्ताविक अँड. शिवाजीराव पिसाळ यांनी केले तर आभार संतोष काळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिका निवडणुकीसाठी नयना गुंडे मुख्य निवडणूक निरीक्षक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगामार्फत मुख्य निवडणूक निरीक्षक तसेच निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने नयना गुंडे, आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे ह्य यांची सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच मल्लिकार्जून माने, अपर जिल्हाधिकारी, सातारा यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे.

निवडणूक प्रक्रिये दरम्यान आचारसंहितेचे पालन, निवडणूक कामकाजातील पारदर्शकता तसेच निष्पक्ष व निर्भय वातावरणात निवडणूक पार पाडण्याच्या दृष्टीने हे निरीक्षक कामकाज पाहणार आहेत.निवडणूक संदर्भात कोणत्याही प्रकारच्या तक्रारी, हरकती किंवा सूचना असल्यास नागरिकांनी त्याबाबत मुख्य निवडणूक निरीक्षक अथवा निवडणूक निरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा. दोन्ही निरीक्षक शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे वास्तव्यास असून नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी तेथे उपलब्ध असतील.सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोग कटिबद्ध असून नागरिकांनी निर्भयपणे आपल्या तक्रारी मांडाव्यात, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# नूरजहाँ शेख यांची काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र राज्य, यांच्या वतीने श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर) येथे चौथे फातिमाबी शेख मुस्लिम साहित्य संमेलनात आयोजित कवीसंमेलनाच्या अध्यक्षपदी गणेशगाव (ता.माळशिरस) येथील कवयित्री तथा फिनिक्स इंग्लिश स्कूल संस्थापक अध्यक्षा नूरजहाँ फकृद्दिन शेख निवड करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या कवयित्री नूरजहाँ शेख यांची कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गणेशगाव व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भारतातील पहिल्या मुस्लिम मराठी शिक्षिका,युगस्त्री फातिमाबी शेख यांच्या जयंतीनिमित्त, श्रीरामपूर येथे ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित केलेल्या, एक दिवशीय ४ थे फातिमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन रविवार दि.११ जानेवारी २०२६ आयोजित करण्यात आले आहे.या कविसंमेलनामध्ये संपुर्ण दिग्गज कवि आपली कविता सादर करण्यासाठी सहभागी होत असतात.संपुर्ण महाराष्ट्रातून नामवंत कवी या संमेलनात उपस्थिती दर्शवितात.

कवयित्री नूरजहाँ शेख यांचा " मन की लहरे " हिंदीतून कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे तर "माझं शिवार "मराठी काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे.तसेच "आयुष्याच्या वळणावरती " हा काव्यसंग्रह लवकरच प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे तर त्यांचा पत्रकार म्हणून ही माळशिरस तालुक्यात नावलौकिक आहे.

अनेक वृत्तपत्रात बातमीदारीचे काम करीत असतात तसेच अनेक दिवाळी अंकातून कथा प्रसिद्ध झाल्या आहेत.वेगवेगळ्या वृत्तपत्रातून वैचारिक लेख ही प्रसिद्ध झाले आहेत.त्यांना उत्कृष्ट लेखन कौशल्यासाठी अनेक ठिकाणी पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे.त्यांच्या निवडीमुळे माळशिरस तालुक्यातील कवी व पत्रकारातून त्यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होवू लागला आहे.

# वाळवंट, प्रदक्षिणामार्ग व मंदिर परिसरात अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी -प्रांताधिकारी इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** माघ शुद्ध एकादशी 29 जानेवारी 2026 रोजी होणार असून, यात्रा कालावधी 23 जानेवारी ते 02 फेब्रुवारी आहे. या कालावधीत पंढरपुरात तीन ते चार लाख भाविक येतात. यात्रा कालावधित भाविकांची सोयी सुविधांना प्राधान्य देऊन, वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग व मंदिर परिसर तसेच शहीरातील मुख्य रस्त्यांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या

माघवारी पूर्व नियोजनाबाबत प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे



वैद्यकीय अधिक्षक विजयकुमार सरडे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश आनेचा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ढोले यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत नगरपालिकेने शुध्द व पुरेशा पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, नदीपात्रातील वाळवंटाची व घाटाची स्वच्छता करावी, 65 एकर व नदीपात्रात तात्पुरते शौचालयाचे उभारणीचे नियोजन करावे. 65 एकरमध्ये भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरेसा वीजपुरवठा आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. मंदिर समितीने यात्रा कालावधीत दर्शन रांग दर्शन मंडप या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात. दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही याची दक्षता घेऊन जादाचे सुरक्षा रक्षक नेमावेत.

आरोग्य विभागाने यात्रा कालावधीत पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवावा. नदी पात्रात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध राहील याबाबत पाटबंधारे विभागाने नियोजन करावे. नदीपात्रात प्रशिक्षित कर्मचाऱ्यासह यांत्रिक बोटी सज्ज ठेवाव्यात.

आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावावाते. मंदिर प्रशासनाने पोलीस प्रशासनाला जादाचे सुरक्षा रक्षक उपलब्ध करून द्यावेत. अन्न औषध प्रशासनाने खाद्यपदार्थाच्या व प्रसादाच्या दुकानांची वेळोवेळी तपासणी करावी अशा सूचनाही यावेळी प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.

नगरपालिका प्रशासनाकडून वारी कालावधीत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा, स्वच्छता, तात्पुरते शौचालय, कचरा व्यवस्थापन आदी बाबतची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. तसेच यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी व भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले असल्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी सांगितले.

माघ यात्रा कालावधीत मंदिर समितीने भाविकांच्या सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य दिले असून भाविकांसाठी दर्शन मंडप, दर्शन रांग या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश आनेचा यांनी सांगितले.

# नेताजी खंडागळे यांच्या कार्यकर्तृत्वावर आधारित कॅलेंडरचे भव्य अनावरण



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते नेताजीभाऊ खंडागळे यांच्या सामाजिक, शैक्षणिक व विकासाभिमुख कार्यावर आधारित कॅलेंडरचे अनावरण मोठ्या उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमास नागरिक, कार्यकर्ते व भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी नेताजीभाऊ खंडागळे यांच्या सातत्यपूर्ण व लोकहिताच्या कायार्चा विशेष उल्लेख करत त्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.

समाजातील सर्वसामान्य घटकांसाठी त्यांनी राबवलेल्या उपक्रमांमुळे परिसराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाल्याचे आमदारांनी सांगितले.

सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण, आरोग्य व विकासाच्या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास अक्कलकोटचे नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष महेशदादा बिराजदार, महादेव शिंदे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी कॅलेंडरच्या माध्यमातून नेताजीभाऊ खंडागळे यांच्या कायार्चा व्यापक परिचय समाजापर्यंत पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी नेताजीभाऊ खंडागळे यांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा देत त्यांच्या पुढील सामाजिक कायार्साठी शुभेच्छा दिल्या. उत्साही वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे परिसरात सकारात्मक चर्चा व समाधान व्यक्त करण्यात आले.

या कॅलेंडरमुळे नेताजीभाऊ खंडागळे यांच्या कायार्चा आदर्श नव्या पिढीसमोर मांडला जाईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पर्यावरण संवर्धनासाठी वनराई बंधारे उपयुक्त- जंगम

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरण संवर्धनासोबतच पाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीने वनराई बंधारे उपयुक्त ठरत असल्याचा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी व्यक्त केला. अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे येथील वनराई बंधाऱ्याच्या पाहणी दौऱ्यात जंगम बोलत होते. यावेळी जंगम यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

मुख्यमंत्री समृध्द पंचायराज अभियानांतर्गत सीईओ कुलदीप जंगम यांनी दहिटणे गावास भेट देत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला.



मुख्यमंत्री समृध्द गाव योजनेअंतर्गत तालुक्यातील पाच गावे लक्ष्यित असल्याने या दौऱ्यादरम्यान त्यांनी विविध विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी जंगम यांनी स्वच्छता, घरकूल योजना, आयुष्मान भारत योजना, महिलांची आरोग्य तपासणी, ॲनेमियाचे उच्चाटन,

महिलांच्या सभा तसेच बचत गटांमार्फत स्वयंरोजगार यांसारख्या सर्व उपक्रमांचा एकत्रित कॅम्प आयोजित करण्याचे आवाहन केले. यामुळे गावकऱ्यांना एकाच ठिकाणी सर्व योजनांचा लाभ मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना त्यांनी थकीत कर वसुली डिसेंबरअखेर भरल्यास ५० टक्के सूट मिळणार असल्याची माहिती दिली. तसेच आयुष्मान भारत कार्ड काढून योजनेचा लाभ घ्यावा, त्यातून प्रशस्त वैद्यकीय मदत मिळते, असे आवाहन केले. या दौऱ्यावेळी गटविकास अधिकारी शंकर कवितके, उपअभियंता उषा बिडला, सहायक गटविकास अधिकारी अमोल मुंडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, वैद्यकीय अधिकारी शिवलीला माळी, उपअभियंता व्ही. डी. राठोड, सरपंच नितीन मोरे, उपसरपंच शरणू कोलशेट्टी, विस्तार अधिकारी यू. एम. पठाण, ग्रामपंचायत सदस्य विकी बाबा चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी अभिमन्यू ताड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.